# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ५ मे, २०२२

---

जळगाव दि.५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागातील एम.एड्‌ प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांव्दारे माणुसकीची जाणीव या उपक्रमांतर्गत जळगाव शहरातील शिरसोली रोड वरील अस्थाई झोपडपट्टीच्या परिसरात गरजू बालकांना बिस्कीट पुडे व कपड्यांचे वाटप करण्यात आले.

आपल्या प्रत्येकातील माणुसकीच्या जाणीवा जागृत ठेवण्यासाठी आपण समाजाच काहीतरी देणं लागतो ही भावना निर्माण होणे गरजेचे आहे. शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ.मनीषा इंदाणी यांनी माणुसकीच्या जाणीवा हा उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमांतर्गत बुधवार दि.४ मे रोजी सकाळी ११.००वाजता शिरसोली रोड वरील अस्थाई झोपडपट्टीच्या परिसरात गरजू बालकांना ४०० बिस्कीट पुडे व कपड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी निरागस बालकांच्या चेहऱ्यावर हास्य व आनंद दिसून आला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.जयश्री शिंगाडे, डॉ.रणजित पारधे, प्रा.समाधान कुंभार, जयश्री पाटील व एम.एड्‌ प्रथम वर्षातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी